दूरध्वनी : २५३३ १२११
२५३३ १५९०

# ठाणे महानगरपालिका , ठाणे.

महापालिका भवन , सरसेनानी जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग , चंदनवाडी , पांचपाखाडी, ठाणे - ४००६०२
THE MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE

## गणेश विसर्जन, मोहरमनिमित्त महापालिकेची विशेष व्यवस्था
## प्राथमिक आरोग्य, अॅम्बुलन्स आणि पाणी सुविधा देणार

**ठाणे (18)** : सार्वजनिक गणेशोत्सव विसर्जनाच्या दिवसाबरोबरच मोहरम सणाच्यादिवशी भाविकांना महापालिकेच्यावतीने प्राथमिक आरोग्य व्यवस्था, अॅम्बुलन्स तसेच पाणी सुविधा देण्याचा निर्णय महापालिका आयुक्त संजीव जयस्वाल यांनी घेतला असून तशा सूचना त्यांनी संबंधित अधिका-यांना दिल्या आहेत.

यावर्षी पहिल्यांदाच महापालिकेच्यावतीने सार्वजनिक गणेश विसर्जनाच्यादिवशी पारसिक, कोलशेत, कोपरीसह इतर महत्वाच्या विसर्जन ठिकाणी विसर्जनासाठी येणा-या भाविकांसाठी मोफत बिस्कीट्स आणि चॉकलेट्स देण्यात येणार आहेत. विसर्जनस्थळी त्यासाठी स्वतंत्र स्टॉल ठेवण्यात येणार आहे. त्याचबरोबर सर्व ठिकाणी पिण्याच्या पाण्याचे टँकर ठेवण्याच्या सूचनाही त्यांनी पाणी पुरवठा विभागाला दिल्या आहेत.

दरम्यान मोहरम सणाच्या दिवशीही महापालिकेच्यावतीने मुंब्रा, राबोडी आणि हाजुरी या ठिकाणी प्राथमिक आरोग्य सुविधा, अॅम्बुलन्स, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, विद्युत व्यवस्था, अग्निशमन विभागाची छोटी गाडी आदी सुविधा देण्याच्या सूचना त्यांनी सर्व संबंधित अधिका-यांना दिल्या.

या दोन्हीही दिवशी स्वच्छता आणि इतर आवश्यक गोष्टींची काळजी घेण्याच्या सूचनाही त्यांनी आजच्या बैठकीत सर्व अधिका-यांना दिल्या.